| MHAK070001512010 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र. २१/२०१० मधील</u>**<br>**<u>निशाणी क्र.११४ वर आदेश</u>**<br>(दिनांक १८ ऑक्टोबर, २०२४) |
|---|---|

**१.** प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.४ यांनी नि.क्र.१ वर पारीत दि.१६.०२.२०२४ रोजी पारीत झालेला एकतर्फी आदेश बाजूला सारुन लेखी जबाब दाखल करण्यासाठी सादर केलेला आहे. त्यामध्ये असे कथन केलेले आहे की, दाव्यातील मुळ प्रतिवादी मयत झाल्यानंतर वादीचा प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना वारस म्हणून अभिलेखावर घेण्याचा अर्ज मंजुर करण्यात आल्यानंतर त्यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला आहे. त्यानंतर वादीने पुन्हा प्रतिवादी क्र.४ ते ६ यांना वारस म्हणून अभिलेखावर घेण्याकरीता अर्ज सादर केल्यानंतर त्या दाव्याचे समन्स प्रतिवादी क्र.४ नामे शालीनी सुभाष मसने यांना मिळाले, परंतु वयोवृध्द असल्यामुळे तारखेवर हजर राहता आले नाही. न्यायालयाने दि.१६.०२.२०२४ रोजी नि.क्र.१ वर प्रतिवादी क्र.४ ते ६ यांच्या विरुध्द एकतर्फी आदेश पारीत केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दाखल केलेला लेखी जबाब प्रतिवादी क्र.४ (शालीनी) यांना आहे तसा स्वीकारायचा आहे. वादाचे स्वरुप पाहता, जबाब दाखल न केल्यास प्रतिवादी क्र.४ शालीनी यांचे अपरिमीत नुकसान होईल. सबब, अर्ज मंजुर करण्याची विनंती प्रतिवादी क्र.४ शालीनी सुभाष मसने यांनी केली आहे.

**२.** वादीतर्फे त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास प्रखर विरोध केलेला आहे. त्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.४ शालीनी यांना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्याची संधी दिली होती, परंतु त्यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला नाही. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजुर करावा, अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

**३.** अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला. तसेच दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**४.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, दि.१०.१०.२०२३ रोजी शालीनी सुभाष मसने यांना न्यायालयाचे समन्सची (नि.क्र.१०८) प्रमाणे रितसर बजावणी झालेली आहे, परंतु त्यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल न केल्यामुळे दि.१६.०२.२०२४ रोजी नि.क्र.१ वर शालीनी यांच्याविरुध्द एकतर्फी

आदेश पारीत करण्यात आलेला आहे. त्यानंतर, दि. ०२.०५.२०२४ रोजी प्रस्तुत अर्ज सादर करुन शालीनी यांना लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली आहे. समन्सची बजावणी होवून ४ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीनंतरही शालीनी यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला नाही. शालीनी मसने यांचे वय हे ६० वर्षे असल्याचे दिसून येत असल्यामुळे अर्जात नमुद केलेले कारण रास्त दिसून येत आहे. त्यामुळे त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी आणि नैसर्गिक न्याय तत्वाचे पालन करण्यासाठी अर्ज मंजुर करणे आवश्यक आहे. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

प्रस्तुत अर्ज नि.क्र.११४ रक्कम रु.२००/–कॉस्ट सह मंजुर करण्यात येत आहे.

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2024.10.19 10:47:47 +0530

**दिनांक : १८/१०/२०२४.**
**ठिकाणः बाळापूर**

**( विष्णु द. गिते )**
**सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),**
**बाळापूर.**

| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
|---|---|---|
| Name of the Court | :- | **Shri. Vishnu D. Gite**<br>Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Ajay N. Hande |
| Date of Decision | :- | 18/10/2024 |
| Order signed by P.O on | :- | 18/10/2024 |
| Order uploaded on | :- | 19/10/2024 |